मा. अध्यक्ष महोदया, व सन्मा. सभागृह,

लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. प्रथम महापौर श्री. राजीवजी पाटील साहेब, व्दितीय महापौर श्री. नारायणजी मानकर साहेब, व मा. महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर मॅडम यांच्या कुशल नेतृत्वाखाली काम करण्याची मला संधी मिळाली यात मी धन्यता मानतो. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लोकनियुक्त लोकप्रतिनिधींनी तयार केलेला हा सहावा व सभापती स्थायी समिती म्हणून माझे कार्यकाळातील दुसरा व परिवहन उपक्रमाचा परिवहन समितीने तयार केलेला तिसरा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्याचा बहुमान मला मिळाला, याबद्दल मी त्यांचा व आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. महानगरपालिकेच्या कामकाजासाठी आपले आदरणीय लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, तत्कालीन खासदार बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. निरंजनजी डावखरे साहेब, माजी महापौर व माजी उपमहापौर भुतपुर्व नगरपरिषदांचे माजी नगराध्यक्ष व इतर सन्मा. पदाधिकाऱ्यांसह दिलेल्या भेटीमध्ये मा. नाम. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, मा. खासदार श्री. चिंतामणजी वनगा साहेब, पालकमंत्री मा. नाम. श्री. विष्णुजी सावरा साहेब, विधानपरिषदेचे तत्कालीन उपसभापती मा. नाम. श्री वसंतरावजी डावखरे साहेब, तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा. श्री. अजीतदादा पवार साहेब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आजी माजी आयुक्त तसेच केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे सनदी अधिकारी यांच्या वेळोवेळीच्या सदिच्छा व मार्गदर्शन आपल्या पाठीशी सदैव राहीले आहे. बहुजनांचा विचार करुन बहुजनांच्या हितासाठी असलेला बहुजनांचाच हा अर्थसंकल्प सादर करताना मा. महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर मॅडम, मा. उपमहापौर श्री. उमेशजी नाईक साहेब, माजी. उपमहापौर श्री. सगिरजी डांगे साहेब, श्री. रुपेशजी जाधव साहेब, मा. सभागृह नेते श्री. फ्रँक डिसोझा साहेब, माजी. स्थायी समितीचे सभापती मा. श्री. जितेंद्रजी शहा साहेब, मा. श्री. अजीवजी पाटील साहेब, व श्री संदेशजी जाधव साहेब, यांचे नियमित व विशेष मार्गदर्शन तसेच सर्व प्रभाग समित्यांचे सभापती सर्व पदाधिकारी यांनी मला वेळोवेळी भेटून केलेल्या मौलीक सुचना या सर्वांचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात उमटले आहे. सर्व सन्मा.

गटनेते व सदस्याकडून तसेच सर्व सन्मा. नागरीकांकडून देखील त्यांचे विचार व अपेक्षा आणि कल्पना जाणून घेण्याचा आम्ही प्रयत्न केला असून त्याबाबीदेखील या अर्थसंकल्पात विचारात घेतल्या आहेत. महानगरपालिकेचे अंदाजपत्रक म्हणजे संकल्प व संकल्पपुर्तीचा लेखाजोखा असतो. या दृष्टीने गेल्या तीन वर्षात प्रत्यक्षात केलेली वाटचाल ही आपल्यासमोर या अंदाजपत्रकातील आकडेवारीवरुन येते. तसेच आगामी वर्षातील तरतुदीद्वारे आपण तयार केलेल्या विकास योजना अंदाजपत्रकाच्या रुपाने आपल्यासमोर येतात. सदर विकास कामे ही त्या त्या आर्थिक वर्षात पुर्ण करावयाचा मनोदय असतो. मला मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, यांचे आशिर्वादाने लागोपाठ दोनदा मा. स्थायी समिती सभापती पद भुषविण्याची संधी मिळाली. त्यामुळे अंदाजपत्रकातील योजनांची अंमलबजावणी कशा रितीने होते हे जवळून पहाता आले.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या निर्वाचित सदनाचे हे सहावे अंदाजपत्रक आपणांसमोर सादर करीत असताना मला अतिशय आनंद होत आहे. महानगरपालिकेचे महत्वाचे उत्पनाचे साधने एकत्रित मालमत्ता कर, स्थानिक संस्थाकर, विशेष अधिनियमांखालील वसुली ही उत्पनाची मुख्य स्त्रोत असून महानगरपालिकेच्या खर्चाच्याबाजू या उत्पन्नावर अवलंबून असतात. त्यामुळे प्रशासनाने उत्पन्न वाढीसाठी कसोशीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. उदा. एकत्रित मालमत्ता कराचे उत्पन्न हे महापालिकेचे स्थायी उत्पन्न असून महानगरपालिकेच्या कर खात्याने कर योग्य मुल्याचा अभ्यास करुन नियमानुसार ज्या मालमत्तांवर कर आकारणी झाली नाही, त्यावर काटेकोरपणे कर आकारणी करून त्या मालमत्ता करनिर्धारण यादीत आणणे आवश्यक आहे. तसेच ज्या मालमत्तांवर कमी कर योग्य मुल्याने आकारणी झाली त्या मालमत्ता शोधून त्यावर कर आकारणी अद्यावत करणे. विशेष अधिनियमांखालील वसुलीकडे प्रशासनाने अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. उदा. जाहिरात भुई भाडे, विकास अधिभार वसुली, नगररचना विभागाकडील इतर वसुली व महानगरपालिकेस शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाचा पाठपुरावा करणे आवश्यक व गरजेचे आहे, जेणे करुन महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल त्यासाठी प्रशासनाने विशेष व्यवस्था करावी. हा अर्थसंकल्प मांडतांना सर्व समाज घटकांना योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला. दि. २७/२/२०१७ मा. आयुक्त साहेब यांनी अर्थसंकल्पीय अंदाज सादर मा. स्थायी समितीपुढे सादर केले. तद्नंतर ३ मार्च पर्यंत मा. स्थायी समितीने सर्वकष विचार विमर्ष करुन दुरुस्तीसह **सन २०१६-२०१७ प्रारंभिक शिल्लक रु. ३६७ कोटी, जमा रु. १०६२ कोटी व खर्च १०८६ कोटी चा सुधारीत अर्थसंकल्पासह व सन २०१७-२०१८ प्रारंभिक शिल्लक ३४३ कोटी, जमा रु. १५२४ कोटी व खर्च १७६२ कोटी आणि १०५ कोटी शिल्लकेचे असे एकूण १८६७ कोटीचा अर्थसंकल्पिय अंदाज** तयार केले असून ते मी आपल्या स्विकृतीसाठी सादर करीत आहे.

## अर्थसंकल्पातील महत्वाच्या ठराविक तरतुदी

- आगामी वर्षात देखील मालमत्ता कराचा भरणा ५ वर्षाचा आगाऊ भरण्याऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात १५ % दराने प्रोत्साहनपर सवलत देण्याची तरतुद केली आहे.
- स्वातंत्र सैनिक त्यांची विधवा पत्नी तसेच त्यांचे पुढील पहिल्या पिढीतील एका वारसाला त्याच्या राहत्या निवासी सदनिकेस त्याच्या वेळीवेळीच्या मागणी नुसार मालमत्ता करात १०० % सुट आहे.
- आजी माजी सैनिक अथवा त्यांचे अवलंबीतास मागणीनुसार मालमत्ता करात ५० % सुट आहे.
- नव्याने बांधकाम परवानगी देताना विकासकांनी इमारतीमध्ये पाण्याच्या पुन: वापर करणेसाठी स्वतंत्र उपाययोजना करण्याचे बंधन घातले जात असून सद्यस्थितीतील जे मालमत्ता धारक पिण्याचा पाण्याव्यतिरीक्त अन्य प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा पुन: वापर करण्याची योजना महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या संमतीने अंमलात आणतील त्यांना पाणी पट्टीच्या देयकात २ % सवलतीसह योजना खर्चाच्या २० % परंतु अधिकतम रु. १ लक्ष इतका खर्च अदा करणेची तरतूद केली आहे.
- नव्याने विकसित केल्या जाणाऱ्या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टींग योजनेची अंमलबजावणी सक्तीने चालू असून यामुळे नविन इमारतींना रेन हार्वेस्टींग व्यवस्था झाली आहे. यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढणेस मदत झाली आहे. सबब अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत महानगरपालिकेच्या संमतीने रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना याकामी प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामध्ये सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ठ असल्याने मालमत्ता कराच्या २ % सवलतीसह योजना खर्चाच्या २० % परंतु अधिकतम रु. १ लक्ष इतका खर्च अदा करणेची तरतूद केली आहे.
- निसर्ग ऋण प्रकल्प राबविणेसाठी एकत्रित मालमत्ता कराच्या २ % सवलतीसह योजना खर्चाच्या २० % परंतु अधिकतम रु. १ लक्ष इतका खर्च अदा करणेची तरतूद केली आहे.

### सन २०१६-१७ मध्ये खाली दर्शविलेले विकास कामे पुर्ण झालेली आहेत.

१ विरार (प.) तिरुपती नगर येथे भाजी मार्केट.

२ चांदिप येथे सामाजिक सभागृह.

३ व.वि.श.म.भुयारी गटार योजना संकलन प्रणाली प्रक्रिया केंद्र, आणि पुर्नवापर, टप्पा १ चे काम पुर्ण झाले आहे.

४ चिखलडोंगरी येथील चिखलडोंगरी तलाव सुशोभिकरण.

५ वॉर्ड क्र. ६३ (नविन ९०) मध्ये सातिवली आंबेडकर नगर येथे आरोग्य केंद्राचे नुतनीकरण.

६ वृंदावन गार्डन येथे सामाजिक सभागृह.

७ वॉर्ड क्र. ६३ (नविन ९०) मध्ये सातिवली येथे समाजमंदिर.

८ आगाशी फिश मार्केट लगत शॉपिंग/रहिवासी इमारत.

९ वॉर्ड क्र. १०० मधील आनंदनगर उद्यान विकसीत.

१० तुळींज हॉस्पीटल येथे आय.सी.यु. कक्ष उभारणे.

११ वॉर्ड क्र . ७८ (नविन १०५) मध्ये परेरा नगर उद्यान विकसीत.

१२ विरार (पू.) सर्वे नं. १६ मध्ये बहुउद्देशिय इमारत.

१३ वॉर्ड क्र. ९६ मध्ये सनसिटी रोडवरील तुळजाभवानी उद्यान विकसीत.

१४ विरार (पू.) वाचनालय इमारतीचे नुतनीकरण.

१५ दिवाणमान येथील स्विमिंगपूल इमारतीतील जिम्न्यॅशियम व शूटींग रेंजचे बांधकाम.

१६ राजनगर येथे समाजमंदिर .

१७ प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील तामतलावाचे सुशोभिकरण.

१८ भाटेला तलाव सुशोभिकरण.

१९ प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील पाचूबंदर स्मशानभुमीचे नुतनीकरण.

२० नालासोपारा पश्चिम मैदान विकसीत करणे.

**अंध अपंग कल्याण अर्थसंकल्प**

❖ अंध अपंग गतिमंदाकरीता कल्याणकारी योजना राबविण्याऱ्या संस्थाना अनुदान देणेकरीता सन २०१७-१८ मध्ये ७५ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

❖ अंध अपंग मुलीच्या लग्नासाठी महिला बालकल्याण समिती मार्फत अनुदान सन २०१७-१८ मध्ये २५ लक्ष तरतुद केली आहे.

❖ ज्या मुलीचे आई वडील अपंग आहेत त्यांच्या लग्नासाठी महिला बालकल्याण समिती मार्फत अनुदान सन २०१७-१८ मध्ये २५ लक्ष तरतुद केली आहे.

❖ गतीमंद मतिमंद (विशेष बालक) मुलासाठी अनुदान महिला बालकल्याण समिती मार्फत अनुदान सन २०१७-१८ मध्ये ७० लक्ष तरतुद केली आहे.

❖ कुटुंब प्रमुख ७५ % अथवा अधिक अंध, अपंग असल्यास महिला बालकल्याण समिती मार्फत अनुदान सन २०१७-१८ मध्ये ३० लक्ष तरतुद केली आहे.

❖ अंध, अपंग, कर्णबधीर व मुकबधीर विद्यार्थ्यांना महिला बालकल्याण समिती मार्फत शैक्षणिक अर्थसहाय्य सन २०१७-१८ मध्ये २५ लक्ष तरतुद केली आहे.

❖ अंध अपंग व गतीमंदाकरीता कल्याणकारी योजनेअंतर्गत भांडवली कामे याअंतर्गत सन २०१७-१८ मध्ये २ कोटी ५२ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

**वसई विरार शहर महानगरपालिका महिला बालकल्याण समिती मार्फत विविध उपक्रम राबविण्यांत येत असून महानगरपालिका हद्दितील सर्व समाज घटकांपर्यंत महिला बालकल्याण समिती मार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांमधून लाभ मिळत असून सन २०१७-१८ मध्ये काही ठळक तरतुदी आहे.**

- विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास योजना सन २०१७-१८ मध्ये २ कोटी ५० लक्ष तरतुद केली आहे.
- महिलांना डायलेसिस उपचार करण्यांकरीता सन २०१७-१८ मध्ये ५० लक्ष तरतुद केली आहे.
- विधवा महिलांच्या मुलीच्या लग्नासाठी अनुदान सन २०१७-१८ मध्ये ३० लक्ष तरतुद केली आहे.
- विधवा महिलांच्या मुली / मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य / इयत्ता १ ते ४ थी च्या मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य / इतर पदव्युतर शिक्षणाकरीता महिलांसाठी अनुदान सन २०१७-१८ मध्ये १ कोटी ५५ लक्ष तरतुद केली आहे.
- एकाकी जेष्ठ महिलांच्या उपजिवीकेकरीता अनुदान ६० लक्ष तरतुद केली आहे.
- शालेय विद्यार्थी व अंगणवाडीतील मुलांसाठी साहित्य वाटप सन २०१७-१८ मध्ये ७५ लक्ष तरतुद केली आहे.
- शालेय मुलांसाठी मोफत सायकल योजना सन २०१७-१८ मध्ये ५५ लक्ष तरतुद केली आहे.
- स्त्री चिकित्सा शिबीर, कुष्ठरोग बाधित निराधार महिला व मुलींना महिला बालकल्याण समिती मार्फत उपचार व पोषण भत्ता यासाठी सन २०१७-१८ मध्ये २५ लक्ष तरतुद आहे.
- नवजात रुग्ण बालकांस आवश्यक सुविधा पुरविणेसाठी अर्थसहाय्य सन २०१७-१८ मध्ये १५ लक्ष तरतुद केली आहे.

**आर्थिक दुर्बल घटकांसाठी**

- महानगरपालिका रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना मोफत भोजन व अल्पोपहार तथा पोषण भत्ता यासाठी सन २०१७-१८ मध्ये १ कोटी ५० लक्ष तरतुद केली आहे.
- प्रधानमंत्री आवास योजना अथवा त्या धर्तीवर अन्य योजना कामासाठी सन २०१७-१८ मध्ये २ कोटी तरतुद करणेत आली आहे.
- मागासवर्गीय कल्याणकारी राखीव तरतुदी अंतर्गत रस्ता, गटार व इतर विकास कामे करण्याकरीता सन २०१७-१८ मध्ये ६ कोटी तरतुद करणेत आली आहे.

- आर्थिक दुर्बल घटकातील लोकांना खाजगी नविन विहिरी खोदकामासाठी अनुदान सन २०१७-१८ मध्ये १५ लक्ष तरतुद केली आहे.
- आर्थिक दुर्बल घटकातील शेतकऱ्यांसाठी कृषी साहित्य विज पंप, फवारणी पंप, जंतुनाशके बियाणे, खत इत्यादीसाठी सन २०१७-१८ मध्ये ५ कोटी तरतुद केली आहे.
- मच्छिमार व बोटीवरील मजुरांसाठी कल्याणकारी योजना २ कोटी तरतुद करणेत आली आहे.

**लोकशिक्षण व सामाजिक कार्यक्रम या अंतर्गत**

- आंतर शालेय कलाक्रिडा महोत्सव सन २०१७-१८ मध्ये २ कोटी १२ लक्ष तरतुद करणेत आली आहे.
- माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृती परिक्षा तसेच राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय परिक्षा व स्पर्धा परिक्षा मधील यशस्वी विद्यार्थीचा गुणगौरव सन २०१७-१८ मध्ये ५ लक्ष तरतुद करणेत आली आहे.
- विश्वस्त नोंदणीकृत रुग्णालय तसेच निराधार व निराश्रीत मुलींसाठी कार्य करणाऱ्या संस्था, ग्रंथालये व इतर विश्वस्थ नोंदणीकृत संस्थाना अनुदान सन २०१७-१८ मध्ये २ कोटी २५ लक्ष तरतुद केली आहे.
- खेळ व संघ दत्तक घेणेसह विविध स्पर्धांसाठी खेळ व संघांचे प्रायोजकत्व स्विकारणे तसेच संघाना व खेळाडुना व्यक्तीगत अर्थसहाय्य १ कोटी तरतुद करणेत आली आहे.
- युवकांसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम, वाचनमाला व स्पर्धापरिक्षा मार्गदर्शन, खुल्या प्रवर्गातील दहावी व बारावीमधील गुणानुक्रमे प्रथम दहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व पारितोषिक, महिला बाल कल्याण समितीमार्फत शालेय विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप तसेच महिला बाल कल्याण समितीमार्फत सामुदायीक विवाह सोहळया अंतर्गत वर पक्षास अनुदान व इतर युवक कल्याणाच्या योजना सन २०१७-१८ मध्ये २ कोटी तरतुद करणेत आली आहे.
- महापौर सहाय्यता निधी सन २०१७-१८ मध्ये २५ लक्ष तरतुद करणेत आली आहे.

**सामाजिक वनीकरण.**

- वसई विरार शहर महानगरपालिका संपुर्ण महानगर क्षेत्रात व रस्त्याच्या दुतर्फा २०५०० वृक्ष लागवड करण्यात आली आहे.

- ❖ सुपर्ण महानगरपालिका क्षेत्रात ३०६४१४ इतके वृक्ष लागवड करण्यात आली आहे.
- ❖ १२५ हेक्टर क्षेत्रावर त्रिपक्षीय करारान्वये २२५००० इतके वनीकरण करण्यात आले आहे.
- ❖ वसई विरार शहर महानगरपालिकेच धुकटन येथे रोपवाटीका तयार केली आहे. तसेच प्रस्तावित पेल्हार व निर्मळ येथे रोपवाटीका तयार करण्यात येणार आहे. यासह वृक्ष संगोपण वृक्ष लागवड व इतर अनुषंगीक कामे याकरीता सन २०१७-१८ मध्ये १७ कोटी ३१ लक्ष तरतुद करणेत आली आहे.

### नाले/खोदाई सफाई

- ❖ पाण्याचा निचरा होऊन रस्त्यावर पाणी तुंबू नये नाले सफाई करीता सन २०१७-१८ मध्ये ५ कोटी ५० लक्ष तरतुद करणेत आली आहे.

### पाणी पुरवठा व्यवस्था

- ❖ वसई विरार शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता पाण्याच्या उपलब्धतेसाठी नवनवीन स्त्रोत विकसीत करणे, याकरीता लोकनेते मा. हितेंद्रजी ठाकूर साहेब यांची दुरदृष्टी व अथक प्रयत्नाने ३२ द.ल.लि. उसगांव पाणीपुरवठा योजना, १०० द.ल.लि. सुर्या योजना, कार्यान्वीत असून त्यानंतर १०० द.ल.लि. २९६ कोटी किमतीच्या सुर्या योजना टप्पा -३ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत योजनेस मान्यता प्राप्त झाली. या योजनेस ५० % शासन अनुदान १३४ कोटी मंजूर करण्यात आले तद्नंतर लोकनेते मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब यांच्या मार्गदशानाखाली मा. आमदार श्री. क्षितीज ठाकूर, मा. आमदार श्री विलास तरे यांच्या प्रयत्नाने योजनेसाठी ५० % वरुन ७० % अनुदान वाढवून घेण्यात आले. महानगरपालिकेस ते प्राप्त झाले असून हया योजनेचे काम अंतिमटप्यात असून लवकरच ही योजना कार्यान्वीत होऊन शहरास १०० द.ल.लि. वाढीव पाणीपुरवठा होणार आहे.

मा. लोकनेत्यांनी लोकनेत्यांनी भविष्यातील गरज लक्षात घेऊन नवीन पाणी स्त्रोत म्हणून देहरजी नदीवर विक्रमगड तालुक्यातील साखरे येथे धरण बांधुन मिळावे म्हणून तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्याकडे आग्रहाची भुमिका मांडली त्या अनुषंगाने (शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१४/प्र.क्र.६८/१० मध्येम प्रकल्प दि. ४/३/२०१४ अन्वये) शासनाने देहरजी प्रकल्प वसई विरार शहर महानगरपालिकेस आरक्षित केला आहे. सदर प्रकल्पाच्या वन विभागासहीत सर्व परवानगी प्राप्त असून त्या अनुषंगाने प्रथमत: १५० कोटी व नंतर १५ कोटी २९ लक्ष एकूण १६५ कोटी २९ लक्ष इतकी रक्कम वर्ग केली असून जलसंपदा विभागामार्फत पुढील कामास सुरुवात झाली आहे.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानात वसई विरार शहर महानगरपालिकेचा समावेश झाल्यानंतर मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. आमदर श्री क्षितीज ठाकूर व मा. आमदार श्री. विलास तरे यांच्या प्रयत्नाने महापालिकेसाठी १३० कोटीच्या अतिरिक्त पाणी पुरवठा योजनेस शासनाने मान्यता दिली. सदर योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात सुमारे ३०० कि.मी. विविध व्यासाच्या जलवाहिनी अंथरणे व २१ ठिकाणी जलकुंभ उभारणे याकामांचा समावेश आहे.

**सन २०१७-१८ मध्ये खालील प्रमाणे विकास कामे पुर्ण करणेचा मानस आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मजेठिया नाटयगृह स्टेज इमारतीची पुर्नबांधणी व नाटयगृह बांधकाम करणे. | २ | मुलजीभाई मेहता शाळेजवळ नाटयगृह/सांस्कृतिक भवन बांधणे. |
| ३ | लक्ष्मीबेन छेडा मार्ग येथे गार्डन रंगमंच बांधणे. | ४ | मौजे विरार सर्वे नं. ३७६ मधील प्रस्तावित प्रशासकीय इमारत. |
| ४ | मौजे मालोंडे सर्वे नं. ४१/अ मधील प्रस्तावित नाटयगृह बांधणे. | ५ | तामतलाव येथे तरण तलाव बांधणे. |
| ६ | बिलालपाडा कार्यालय इमारतीची पुर्नबांधणी करणे. | ७ | नालासोपारा पश्चिम मैदान येथे ड्रेसिंग रुम बांधणे. |
| ८ | महानगरपालिका क्षेत्रात रेल्वे स्थानकानजीक पार्किंग लॉट विकसीत करणे. | ९ | मुख्य शहराकडे येणारे सी.सी. रोड बांधणे. |
| १० | विरार (प.) म्हाडा मैदान ते नालासोपारा पेट्रोलपंप ३० मी रुंद रस्ता विकसीत करणे. | ११ | विरार येथे रॅम्प ब्रिज बांधणे. |
| १२ | नारंगी रेल्वे फाटक क्र. ४१ येथे ब्रिज बांधणे. | १३ | वसई रोड (प.) गायत्री मंदिरासमोर क्रिडा संकूल बांधणे. |
| १४ | वसई तालुक्यातील पोस्ट मॉर्टम रुमची बांधकामे. | १५ | वालीव येथील आप्पा मैदान विकसीत करणे. |
| १६ | पाचूबंदर वसई येथे शवविच्छेदनगृह बांधणे. | १७ | नवघर पुर्व येथे दवाखाना बांधणे. |
| १७ | नारिंगी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र नुतनीकरण व वाढीव बांधकाम करणे. | १८ | कम्युनिटी / पे ॲण्ड यूज शौचालय बांधणे. |
| १९ | राम मंदिर तलाव सुशोभिकरण करणे. | २० | आगाशी शंकर मंदिर तलाव सुशोभिकरण करणे. |
| २१ | सर्वोदय नगर, नालासोपारा पुर्व येथे UPHC व प्रसुति गृह उभारणे. | २२ | बोळींज येथे प्राथमिक आरोग्य केंद्र नुतनिकरण व वाढीव बांधकाम करणे. |
| २३ | रानळे तलाव येथे UPHC बांधणे. | २४ | उमराळे तलाव सुशोभिकरण करणे. |

२५ मोरेगांव तलाव येथे आरोग्य केंद्र बांधणे.

२६ करमाळे तलाव सुशोभिकरण करणे.

२७ इद्‌गाह झोपडपट्टी येथे आरोग्य केंद्र बांधणे.

२८ धानिव तलाव सुशोभिकरण करणे.

२९ पेल्हार येथे आरोग्य केंद्र बांधणे.

३० बिलालपाडा तलाव सुशोभिकरण करणे.

३१ डी.एम.पेटीट रुग्णालयामागे RCH सेंटर इमारत बांधणे.

३२ वाकणपाडा तलाव सुशोभिकरण करणे

३३ चंदनसार विभागीय कार्यालयाच्या ठिकाणी बहूउद्देशिय इमारत बांधणे.

३५ संतोषभूवन (तांडापाडा) दिपक चौधरी यांचे घराजवळील तलाव सुशोभिकरण करणे

३६ चंदनसार क्षेत्रातील वैतरणा फणसपाडा येथे बहूउद्देशिय इमारत बांधणे.

३७ विरार (प) सर्वे नं. ४६७ डोंगरपाडा येथे मार्केट बांधणे.

३८ नालासोपारा सर्वे नं. ३२ येथे फिश मार्केट बांधणे.

३९ जुचंद्र स्मशानभूमी विकसीत करणे.

४० उमेळा स्मशानभूमी विकसीत करणे.

४१ पाचुबंदर स्मशानाभूमी / गॅस दाहिनीची उभारणी करणे.

४२ वालीव नाईकपाडा येथे बहूउद्देशीय इमारत बांधणे.

४३ फादरवाडी येथे बहूउद्देशीय इमारत बांधणे.

४४ वालीव येथील स्मशानभूमी विकसीत करणे.

४५ धूमाळनगर येथे स्मशानभूमी विकसीत करणे.

४६ नारिंगी येथे पिकनिक पार्क विकसीत करणे (प्राथमिक सोयी सुविधा अनुदान)

४७ चोबारे येथे स्मशानभूमी विकसीत करणे.

४८ विरार पुर्व येथे वाचनालय व अभ्यासिका बांधणे.

४९ विर सावरकर मधील उद्यान विकसीत करणे.

५० कौलसीटी मध्ये उद्यान विकसीत करणे.

५१ विरार (पू.) आरक्षण क्र. १४२ येथे उद्यान विकसीत करणे.

५२ बोळींज सर्वे नं. ४०१ मध्ये रात्र निवारा केंद्र बांधणे.

५३ वालीव येथे रात्र निवारा केंद्र बांधणे.

५४ विरार सर्वे नं. ३७६ उद्यान विकसीत करणे.

५५ गोखिवरे येथे रात्र निवारा केंद्र बांधणे.

५६ मंजूर विकास आराखड्यातील रस्ते, ग्राऊंड/गार्डन इ. आरक्षित जागा संरक्षित करणे/विकसीत करणे.

असा हा **सन २०१६-२०१७ प्रारंभिक शिल्लक र. रु. ३६७ कोटी, जमा रु. १०६२ कोटी व खर्च रु. १०८६ कोटी चा सुधारीत अर्थसंकल्पासह व सन २०१७-२०१८ प्रारंभिक शिल्लक ३४३ कोटी, जमा रु. १५२४ कोटी व खर्च १७६२ कोटी आणि १०५ कोटी शिल्लकेचा अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक** वैशिष्ट्यपूर्ण सर्वसमावेशक बहुजनांच्या प्रगतीचा, विकासाचा अर्थसंकल्प तयार करताना मा. महापौर, मा. उपमहापौर यांच मौलीक मार्गदर्शन तसेच मा. सभागृह नेते, मा. गटनेते, मा स्थायी समिती सदस्य, मा. महिला बाल कल्याण समिती सभापती, मा. परिवहन समिती सभापती, सर्व प्रभाग समित्यांचे सन्मा. सभापती व मा. आयुक्त, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व त्यांचे सहकारी, नगर सचिव व त्यांचे सहकारी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याची मी जाणीवपूर्वक नोंद घेत आहे.

आपल्या कामातून " प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास " हे पालिकेचे ब्रीदवाक्य सार्थ होईल याची मला खात्री असून त्यासाठी आपण सर्व प्रयत्न करुया.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने वेळोवेळी सहकार्य केले आहे. त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. मा. स्थायी समितीने मंजुर केलेला हा अर्थसंकल्प मी आपणासमोर सादर केला असून ही संधी लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. महापौर महोदया, सौ. प्रविणाताई ठाकूर, मा. उपमहापौर श्री. उमेशजी नाईक साहेब, सर्व आजी माजी पदाधिकारी व माझे मा. स्थायी समितीतील सर्व सहकारी तसेच माझ्या पक्षातील सर्व सन्मा सदस्य व कार्यकर्ते यांनी दिली याबद्दल मी या सर्वांचा सदैव ऋणी राहीन.

मा. स्थायी समितीने मंजूर केलेला अ व क अर्थसकंल्प तसेच परिवहन समिती ब अर्थसंकल्प मंजुर करणेस आपणांस विनंती आहे.

धन्यवाद ! जय हिंद ! जय महाराष्ट्र !

आपला,

(नितीन राऊत)
सभापती
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका